आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१० मे २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- तमिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून तमिळगा वेत्री कळ्ळघमचे विजय यांचा शपथविधी / बहुमत चाचणी येत्या बुधवारी

- आसामात राष्ट्रीय लोकशाही आघाडी विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून हिमंता बिस्वा सरमा यांची निवड/ येत्या मंगळवारी घेणार मुख्यमंत्रीपदाची शपथ

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तेलंगणातल्या सुमारे ९ हजार ४०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचा प्रारंभ

- अशोक खरात प्रकरणी, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांची विशेष तपास पथकाकडून  चौकशी

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, चेन्नईत झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा लखनौ सुपर जायंट्सवर ५ गडी रखून विजय

**<><><><><>**

तमिळनाडूमध्ये  टीव्हीके, अर्थात तमिळगा वेत्री कळघम, या पक्षाचे संस्थापक सी. जोसेफ विजय यांनी आज सकाळी तमिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. विजय यांच्याबरोबर अन्य नऊ मंत्र्यांनीही शपथ घेतली. २३४ सदस्यांच्या सभागृहात विजय यांनी काँग्रेस, सीपीआय, सीपीआय-एम, व्हीसीके, आणि आययूएमएल यांच्या सदस्यांसह १२०  आमदारांचा पाठिंबा मिळवला आहे.

लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि तामिळ चित्रपटसृष्टीतले अनेक मान्यवर या शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते. राजकीय क्षेत्रातल्या पदार्पणातच मुख्यमंत्रीपदाला गवसणी घातल्याबद्दल विजय यांचं विविध नेत्यांकडून

अभिनंदन केलं जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विजय यांचं अभिनंदन केलं असून त्यांच्या आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे तसंच इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आणि सर्वपक्षीय नेत्यांनी विजय यांना शुभेच्छा दिल्या आहेत. श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमार दिसानायके यांनीही विजय यांचं अभिनंदन केलं आहे.

टीव्हीकेनं येत्या बुधवारी विधानसभेत बहुमत सिद्ध करावं असं राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

आसाममधे भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे विधिमंडळ पक्षनेते म्हणून हिमंता बिस्वा सरमा यांची निवड झाली आहे. आसाम भाजपाच्या विधिमंडळ पक्षाची बैठक गुवाहाटी इथं झाली. नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी येत्या मंगळवारी रोजी होणार आहे.

पुदुचेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या मुख्यमंत्रीपदी एन रंगासामी यांची नेमणूक राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केली आहे. येत्या १३ तारखेला त्यांचा शपथविधी होईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज हैदराबाद इथं तेलंगणातल्या सुमारे ९ हजार ४०० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचं उद्घघाटन आणि पायाभरणी केली. यावेळी तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यामध्ये हैदराबाद-पणजी आर्थिक कॉरिडॉरवरच्या गुडेबेलूर-महबूबनगर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६७ च्या चौपदरीकरण प्रकल्पाचा समावेश आहे. पीएम मित्र योजनेअंतर्गत विकसित केलेल्या वरंगळ इथल्या पीएम मित्र पार्कचं आणि सिंधु रुग्णालयाचाही यात समावेश आहे.

या प्रकल्पांमुळे राज्यातलं दळणवळण, संपर्क अधिक मजबूत होऊन मालवाहतूक सुलभ होणार आहे. या विकासकामांच्या माध्यमातून रोजगारही निर्माण होणार असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं....

**होल्ड - PM-Projects**

तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यावेळी म्हणाले की, हा केंद्र सरकारचा एक क्रार्यक्रम नाही तर तेलंगणा राज्याला पुढे नेणारा हा विकास उत्सव आहे. देशाला २०४७ पर्यंत ३० ट्रिलीयन अर्थव्यवस्थेचा संकल्प प्रधानमंत्र्यांनी सोडला असून त्यात तेलंगणा १० टक्के वाटा देणार असल्याचंही त्यांनी व्यक्त केलं.

**<><><><><><>**

बंगळुरू इथं आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ४५व्या वर्धापनदिन सोहळ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सहभाग घेतला. यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटरमधे नव्यानं बांधलेल्या ध्यान मंदिराचं उद्घाटनही त्यांनी केलं. पर्यावरण संवर्धन, युवा सक्षमीकरण, आंतरिक कल्याणाच्या माध्यमातून एक विकसित भारत घडवण्याचं आवाहन मोदी यांनी यावेळी केलं.

**होल्ड.. बाईट - प्रधानमंत्री**

**<><><><><><>**

नौदलाच्या पश्चिम कमांडचे ध्वजाधिकारी म्हणून व्हाईस ॲडमिरल संजय वात्स्यायन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वात्स्यायन सध्या नौदल उपप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. तोफखाना आणि क्षेपणास्त्र प्रणालीमधले तज्ञ असलेले वात्स्यायन १ जानेवारी १९८८ रोजी भारतीय नौदलात दाखल झाले. त्यांनी ३० वर्षांपेक्षा जास्त काळ विविध पदांवर काम केलं असून अनेक आघाडीच्या युद्धनौकांवर सेवा बजावली आहे. त्यांच्या उल्लेखनीय सेवेबद्दल, त्यांना २०२१ मध्ये अति विशिष्ट सेवा पदकानं सन्मानित करण्यात आलं.

**<><><><><><>**

लैंगिक अत्याचार प्रकरणी अटकेत असलेल्या अशोक खरात प्रकरणी, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांची आज नाशिक मध्ये विशेष तपास पथकानं चौकशी केली. यावेळी रुपाली चाकणकर आणि खरात यांचे आर्थिक संबंध, खासगी पतसंस्थांमधली खाती, खरात याच्या धार्मिक संस्थेमधलं चाकणकर यांचं सदस्यत्व, या आणि इतर मुद्द्यांवर विशेष तपास पथकानं चौकशी केली.

<><><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आज चेन्नईच्या चेपॉक स्टेडियमवर झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जनं ५ गडी राखून विजय मिळवला.

चेन्नई सुपर किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला. लखनौ सुपर जायंट्सनं निर्धारित २० षटकात ८ गडी गमावून २०३ धावा केल्या. चेन्नई सुपर किंग्जनं ही धावसंख्या ५ गड्यांच्या मोबदल्यात, सामन्यातले ४ चेंडू बाकी असताना पार केली. या स्पर्धेतला आजचा दुसरा सामना छत्तीसगडमधे रायपूर इथं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सुरु आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ७ षटकात ३ बाद ५७ धावा झाल्या होत्या.

<><><><><><>

विदर्भाला शेतकरी आत्महत्यामुक्त करण्यासाठी, तसंच तिथल्या गावांना जलसमृद्ध करण्यासाठी जलसंधारण ही जनचळवळ बनणं गरजेचं आहे, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते आज नागपुरात वार्ताहर परिषदेत बोलत होते. विदर्भात जलसंधारणाचे काम करणाऱ्या पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवी प्रसंगी नागपूर मध्ये 17

आणि 18 मे रोजी जलसंवाद आणि जलक्रांती परिषदेचं आयोजन केलं आहे. त्याबाबतची माहिती गडकरी यांनी यावेळी दिली.

<><><><><>

देशभरात जर उष्णतेची लाट किंवा पूरस्थिती उद्भवली, तर त्याला तोंड देण्याकरता विविध केंद्रीय सरकारी यंत्रणांच्या असलेल्या सज्जतेबाबत आढावा घेण्याकरता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक घेतली. कोणतीही मनुष्य हानी होऊ नये, तसंच मालमत्तेचं कमीतकमी नुकसान व्हावं याकरता पूर्वसूचना देणाऱ्या यंत्रणांची तयारी, विविध यंत्रणांमध्ये असलेला समन्वय, संसाधनांची उपलब्धता याविषयी त्यांनी या बैठकीत आढावा घेतला. देशभरातल्या पूरनियंत्रणासाठीच्या दूरगामी उपायांचा, तसंच महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांचं पुरापासून संरक्षण करण्यासाठीच्या उपायांचाही आढावाही त्यांनी या बैठकीत घेतला.

<><><><><>

उत्तर प्रदेशात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज आपल्या मंत्रिमंडळाचा विस्तार केला. यामध्ये भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष भूपेंद्र चौधरी आणि भाजपा नेते मनोज पांडे यांचा कॅबिनेट मंत्री म्हणून समावेश करण्यात आला.

राज्यमंत्री अजित पाल सिंह आणि सोमेंद्र तोमर यांना बढती देऊन स्वतंत्र कार्यभार सोपवण्यात आला. तर कृष्णा पासवान, सुरेंद्र दिलेर, हंसराज विश्वकर्मा आणि कैलाश राजपूत यांचा राज्यमंत्री म्हणून समावेश करण्यात आला.

लखनौ इथल्या जन भवनात आयोजित समारंभात राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.

<><><><><>

पंजाबचे उद्योगमंत्री संजीव अरोरा यांना आज १०० कोटी रुपयांच्या जीएसटी घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणी गुरुग्राम इथल्या विशेष न्यायालयानं एक आठवड्याची ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयाची कोठडी दिली. अरोरा यांच्या विरोधातले आरोप गंभीर स्वरूपाचे असून, पैशाच्या व्यवहारांचा छडा लावण्यासाठी त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचं ईडी नं म्हटलं आहे.

//<><><><><><>//